# पॉप, फट, पॉप

(**नाटुकली:** हा प्रसंग बागेत घडत आहे. खो-खो खेळून मुले खूप दमलेली आहेत. त्यांना काहीतरी खायला पाहिजे आहे...)



**पात्र परिचय:**

आवाज एक
आवाज दोन
आवाज तीन
आवाज चार
आवाज पाच
आवाज सहा
फेरीवाला
फेरीवाल्याची नात

**सगळे:** व्वा! काय मस्त खेळ झाला!

**आवाज एक:** अरे, खो-खो खेळून असली मस्त भूक लागलीये ना आता.

**आवाज दोन:** मला पण!

**आवाज तीन:** मला सुद्धा!

**आवाज चार:** आत्ता आपल्याकडे काहीतरी खाऊ असता तर काय मज्जा आली असती नाही?

**आवाज पाच:** हो ना. काहीतरी हलकं, पॉपकॉर्न सारखं...

**आवाज सहा:** हो ना. काहीतरी कुरकुरीत, पॉपकॉर्न सारखं...

**आवाज एक:** हो ना. काहीतरी खारट...

**सगळे:** पॉपकॉर्न सारखं!

**आवाज दोन:** बरोब्बर! काहीतरी बरोब्बर...

**सगळे:** पॉपकॉर्न सारखं!

**आवाज तीन:** पण आपली इच्छा पूर्ण कशी होणार?

**आवाज चार:** इथे आपल्याला पॉपकॉर्न कसा मिळणार?

**आवाज पाच:** ते सुद्धा इथे बागेत?

**सगळे:** अगदीच अशक्य आहे. आणि हास्यास्पद!

**आवाज पाच:** हे मात्र खरं बोललास.

**आवाज सहा:** त्यासाठी काहीतरी जादूच झाली पाहिजे.

**आवाज एक:** एऽऽऽ, ते बघा, ते बघा!

**आवाज दोन:** कुठे? कुठे?

**आवाज तीन:** तेsss बघ तिकडे. रस्त्यावर.

**आवाज चार:** तो फेरीवाला हातगाडी घेऊन चालला आहे का?

**आवाज पाच:** हो. आणि ती छोटी मुलगी त्याच्या शेजारी उड्या मारतीये.

**आवाज सहा:** आणि त्या जुन्या पुराण्या, लाल-लाल हातगाडी मध्ये काय असेल बरं?

**आवाज एक:** तो फेरीवाला आपल्याकडे बघून हसतोय.

**आवाज दोन:** आणि आपल्याला हात करून बोलावतोय.

**आवाज तीन:** जणू काही आपल्यासाठी काहीतरी गम्मत आहे त्याच्याकडे.

**फेरीवाला:** इकडे या ताई, माई, अक्का. पॉप फट काय होतंय ऐका!

**मुलगी:** पॉप फट पॉप!

**आवाज एक:** मला ऐकू येतंय.

**सगळे:** आम्हाला ऐकू येतंय.

**मुलगी:** पॉप फट पॉप!

**फेरीवाला:** मक्याच्या बिया भरकन फुलतात. पांढऱ्या लाह्या खुदकन हसतात.

**आवाज दोन:** मला दिसतंय.

**सगळे:** आम्हाला दिसतंय.

**मुलगी:** पॉप फट पॉप!

**फेरीवाला:** लोण्याचा गंध मस्तच येतो. वाऱ्या बरोबर दरवळतो.

**आवाज तीन:** मला वास येतोय.

**सगळे:** आम्हाला वास येतोय.

**मुलगी:** पॉप फट पॉप!

**फेरीवाला:** तडतड थांबली. लाह्या तयार झालेल्या दिसतायत.

**आवाज चार:** मग, बघायचं का पॉपकॉर्न कसे लागतायत?

**फेरीवाला:** या रे या, सगळे या. पॉपकॉर्नची माझ्या चव बघाया.

**मुलगी:** पॉप फट पॉप!

**आवाज पाच:** कुरकुरीत चव तर छानच आहे.

**सगळे:** कुरकुरीत चव तर छानच आहे. पॉप फट पॉप!

~ डॉना लाथम (अनुवाद: सुजित उपाध्ये, त्रिवेणी मराठी शाळा)

१. पॉपकॉर्न दिसतात कसे?

---

२. पॉपकॉर्नचा आवाज कसा येतो?

---

३. पॉपकॉर्नचा वास कसा येतो?

---

४. पॉपकॉर्न लागतात कसे?

---

अधोरेखित शब्दांचा योग्य अर्थ निवडा.

५. तो <u>फेरीवाला</u> आहे का?
अ) स्वयंपाक करणारा
आ) जादू करणारा
इ) वस्तू विकणारा
ई) गाणी गाणारा

६. त्या जुन्या <u>पुराण्या</u>, लाल-लाल हातगाडी मध्ये काय असेल?
अ) मोडून गेलेली
आ) पॉपकॉर्न भरलेली
इ) छान वास येणारी
ई) खूप जुनी

७. लोण्याचा <u>गंध</u> मस्तच येतो. वाऱ्या बरोबर दरवळतो.

अ) गरम

आ) छान चव

इ) वास

ई) जोराचा वारा

८. पांढऱ्या <u>लाह्या</u> खुदकन हसतात.

अ) पॉपकॉर्नची पिशवी

आ) एक प्रकारचे फूल

इ) मुलगी

ई) फुललेले दाणे

९. खालील अर्थाचे जोडशब्द शोधून त्यांच्याखाली रेघ मारा.

लागली आहे

हसतो आहे

येत आहे

दिसत आहेत

बोलावतो आहे